# महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड

दुरध्वनी क्र. . :- २२६१९१००
फॅक्स :- (०२२) २२६१९६९९
ई-मेल : edse@mahadiscom.in
exdirse@gmail.com

**महावितरण**

**कार्यकारी संचालक यांचे कार्यालय**
**सुरक्षा व अंमलबजावणी**
हाँगकाँग बँक इमारत, ३ रा मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१

क्र.सुवअं/अंमल/परिपत्रक/ No 0 0 0 0 7 दिनांक: 02 JAN 2018

## परिपत्रक

विषय: वीजचोरीची माहिती देणा-यास उत्तेजनार्थ बक्षीस देणेबाबतचा प्रस्ताव पाठविण्याबाबत.

संदर्भ: वाणिज्य परिपत्रक क्र.१४५ दिनांक २९.११.२०११

वरील विषयास अनुसरुन या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे कि, वीजचोरीची माहिती देणा-यास उत्तेजनार्थ बक्षीस देणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविताना संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडून भिन्नता आढळुन येत आहे. तरी सदर प्रस्ताव मुख्य कार्यालयास पाठविताना सुसूत्रता येणेसाठी खालील निर्देश देण्यात येत आहेत.

१. माहितीगाराने दिलेली वीज चोरीची गोपनीय माहितीची नोंद घेण्यासाठी 'गोपनीय कामकाज रजिस्टर प्रत्येक भरारी पथक/क्षेत्रीय कार्यालय तसेच परीक्षेत्र कार्यालय (सुवअं) या कार्यालयाने तयार करावे. (त्याचा नमुना प्रपत्र २ प्रमाणे) सदर रजिस्टरमध्ये गोपनीय माहिती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही माहितीची नोंद घेवू नये.

२. माहितीगाराने वीजचोरीची माहिती लेखी, ई-मेल ने अथवा तोंडी दिली असल्यास त्याची नोंद त्वरीत वरील गोपनीय रजिस्टरला घेण्यात यावी.

३. गोपनीय रजिस्टर हे कार्यालय प्रमुखाने प्रमाणित करावे व ते रजिस्टर कार्यालय प्रमुखाने त्याच्या स्वत:च्या ताब्यात ठेवावे.

४. माहितीगाराकडून माहिती प्राप्त झाल्यापासून संबंधित क्षेत्रीय कार्यालय अथवा फिरते पथक यांनी सदर माहिती प्राप्त झाल्यावर विज संचाची किंवा घटना स्थळाची तपासणी करण्यापूर्वी त्याची नोंद तात्काळ गोपनीय नोंदवहीमध्ये करावी व सदर विजचोरीची तपासणी करण्यापूर्वी किमान एक दिवस अगोदर मुख्य कार्यालयास प्रपत्र-१ उल्लेख केल्याप्रमाणे पत्राने अथवा ई-मेल द्वारे कळविणे अनिवार्य आहे.

५. बक्षीस प्रस्तावासोबत खालील नमुद कागदपत्रांच्या सुस्पष्ट प्रती या कार्यालयास सादर करावीत.

अ) माहितीगाराने दिलेल्या माहितीचे पत्र आवक क्रमांकाच्या नोंदीसह
ब) आपणाकडून वरिष्ठ कार्यालयास तपासणी करण्यापूर्वी दिलेल्या माहितीच्या पत्राची प्रत (प्रपत्र - १ प्रमाणे)
क) वरील गोपनीय नोंद वहीतील सदर नोंदीची सत्य प्रत (प्रपत्र - २ प्रमाणे)
ड) माहितीगाराचे बँक खाते पासबुक झेरॉक्स प्रत अथवा त्याच्या बँक खात्याच्या रद्द केलेला चेक
इ ) स्पॉट इन्स्पेक्शन रिपोर्ट फॉर्म (डी.व्ही.एस.)
ई) घटनास्थळ पंचनामा व मीटर तपासणी पंचनामा
फ) असेसमेंट शीट
ग ) वीजचोरीचे बील व वीजचोरीचे बील भरल्याची पावती
ह) तडजोड रक्कमेचे बील व तडजोड रक्कम भरल्याची पावती

वरील नमुद कागदपत्रांची पूर्तता करुन परिपूर्ण अहवाल मुख्यालयास पाठवावा.

सोबत: प्रपत्र -१ व २

कार्यकारी संचालक (सुवअं)
म.रा.वि.वि.कं.मर्या.मुंबई.

**प्रपत्र - १**

प्रति,

कार्यकारी संचालक (सुवअं)
म.रा.वि.वि.कं.मर्या.
३ रा मजला, हाँगकाँग बँक बिल्डींग
फोर्ट,मुंबई.

विषयः -------------------- कार्यालयास माहितीगाराकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अंमलबजावणी बाबत.

वरील विषया नुसार दिनांक --------- रोजी या कार्यालयास माहितीगाराकडून वीजचोरीची माहिती मिळाली आहे. त्याची नोंद गोपनीय नोंदवहीत घेतली आहे व त्याचा आवक क्रमांक ------दिनांक ---------- आहे. सदर माहितीच्या अनुषंगाने वीजचोरी उघडकीस आणण्यासाठी ---------- भरारी पथक/क्षेत्रीय कार्यालय यांच्याकडून दिनांक ---------- रोजी ----------- (फक्त तालुक्याचे ठिकाण/उप विभाग लिहावे) या ठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे.

माहितीगाराने वरील ठिकाणी वीजचोरी आढळल्यास बक्षीस मिळण्याबाबतची विनंती केली आहे. त्या अनुषंगाने वीजचोरी आढळल्यास बक्षीस प्रस्ताव नंतर पाठविण्यात येईल.

श्री -----------------
पदनाम --------------
कार्यालयाचा पत्ता -------------

**प्रपत्र -२**

| गोपनीय रजिस्टर आवक क्र. | दिनांक | माहितीगाराचे नाव | माहितीगाराचा पत्ता | माहिती सदर कार्यालयास प्राप्त झाल्याची दिनांक | वीजचोरीच्या माहितीचा तपशिल | | | माहितीगाराने उत्तेजनार्थ बक्षीस मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे का ? (हो/नाही) | प्रपत्र १ नुसार मुख्य कार्यालयास माहिती कळविल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ग्रा.क्र./बि.यु. किंवा वीज वापरदाराचे नाव | पत्ता | वीज चोरीचा प्रकार | | | |
| | | | | | | | | | | |